स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

**रासेयो/२०२१–२२/४४१** **दि. २०/०१/२०२२**

**प्रति,**

**मा. प्राचार्य/संचालक**

**रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**पुणे, अमहदनगर व नाशिक जिल्हा**

**विषय : रासेयो स्वयंसेवकांची बि.ओ.डी. लॉगीनवर (BOD Login) ऑनलाईन नोंदणी करण्याबाबत**

**संदर्भ:रासेयो/२०२१–२२/३२१, दि. २५/०९/२०२१ रोजीचे परिपत्रक**

महोदय/महोदया

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सन २०२१–२२ करिता पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील रासेयो एककांना विद्यार्थी संख्या वाटप करण्यात आलेली आहे.

सन २०२१–२२ ह्या वित्तीय वर्षात रासेयो योजनेमध्ये महाराष्ट्र शासन, रासेयो विभाग शासननिर्णयाप्रमाणे एस.सी–१२% व एसटी–१०% व इतर ७८% प्रमाणात स्वयंसेवकांचे अनिवार्यपणे प्रवेश करणे अपेक्षित होते.

रासेयो स्वयंसेवक ऑनलाईन नोंदणी, नियमित उपक्रम प्रस्ताव, विशेष शिबिरे प्रस्ताव आणि त्रैमासिक अहवाल, व इतर माहिती Online पद्धतीनेच निर्धारित वेळेत भरून Upload करण्याचे वेळापत्रक सुद्धा यापुर्वीच प्रसारीत करण्यात आले होते त्यानुसार महाविद्यालयांनी निर्धारीत माहिती भरणे क्रमप्राप्त होते.

परंतु बऱ्याच महाविद्यालयांनी दिलेल्या कालावधीमध्ये रासेयो स्वयंसेवकांची ऑनलाईन नावनोंदणी केलेली नाही, ही अतीशय खेदाची बाब आहे. तरी **दिनांक २२/०१/२०२२ पर्यंत बि.ओ.डी. लॉगीनवर** (BOD Login) **स्वयंसेवकांची एकक निहाय/प्रवर्ग निहाय नोंदणी करणे आवश्यक आहे.**

**दिनांक २२ जानेवारी २०२२ पर्यंतच्या महाविद्यालयांच्या स्वयंसेवक नोंदणी नुसारच एकक निश्चिती करून सदर महाविद्यालयांना अनुदान (नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर) अदा करण्यात येणार आहे याची सर्व कार्यक्रम अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी. दि. २२ जानेवारी २०२२ नंतर महाविद्यालयांना स्वयंसेवकांची नोंदणी कता येणार नाही.** कळावे, ही विनंती.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२० – २५६९७३४१
०२०–२५६२२६८८/८९
मोबाईल : ९८८१९०८०२०
०२० – २५६२२६९२

**संदर्भ : रासेयो/२०२१–२२/३२१** **अतिमहत्वाचे** **दि. २५/०९/२०२१**

**प्रति,**

**मा. प्राचार्य व संचालक**

**रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,**

**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम प्रस्ताव ऑनलाईन (Online) भरणे व रासेयो उपक्रम तात्काळ सुरू करण्याबाबत**

मा. महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने सन २०१७–१८ वर्षापासून राष्ट्रीय सेवा योजना कार्यप्रणाली पूर्णतः ऑनलाईन (Online) करण्यात आली असून सन २०२१–२२ वित्तीय वर्षाचे रासेयो एकक मागणी प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येत आहेत. रासेयो नियमित उपक्रम प्रस्ताव ऑनलाईन जमा करण्याची प्रक्रिया **दि. ०५ ऑक्टोबर २०२१** पर्यंत आणि रासेयो विद्यार्थी नोंदणी **१५ ऑक्टोबर २०२१** पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित आहे. रासेयो एकक मागणी प्रस्ताव ऑनलाईन भरण्याकरिता सोबतच्या Online Application User Mannual चे अवलोकन करावे. रासेयो एकक मान्यता प्रस्ताव ऑनलाईन जमा झाल्यानंतर महाविद्यालयातील रासेयो एककाने आपल्या कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या प्रमाणात मंजूर विद्यार्थी संख्येप्रमाणे रासेयो स्वयंसेवक शुल्काचे तयार झालेले चलन प्रिंट करून शुल्क RTGS/NEFT द्वारे मुदतीत भरावे. शुल्क भरल्यानंतरच महाविद्यालयातील एककास मान्यता प्रस्तावाची प्रिंट घेण्याकरिता पर्याय उपलब्ध होईल. त्यानंतर प्रस्तावांवर मा.प्राचार्यांची स्वाक्षरी व महाविद्यालयाचा शिक्का घेऊन आपला प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी चलनासह पुन्हा अपलोड करणे गरजेचे आहे.

तसेच रासेयो एकक विशेष शिबिरांचे एकक निहाय **प्रस्ताव दि. २५ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर २०२१** दरम्यान भरावेत आणि रासेयो प्रस्तावाची प्रिंट घेण्याकरिता पर्याय उपलब्ध झाल्यावर प्रस्तावांवर एककांनुसार मा. प्राचार्यांची स्वाक्षरी व महाविद्यालयाचा शिक्का घेऊन आपला प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी पुन्हा अपलोड करणे गरजेचे आहे.

दिलेल्या मुदतीत वरील प्रक्रिया पूर्ण करणाऱ्या रासेयो महाविद्यालयांनाच एकक मान्यता व कार्यक्रम अधिकारी मान्यतापत्र मा. प्राचार्य व संबधित कार्यक्रम अधिकारी (महाविद्यालयाच्या Teacher Profile मध्ये नमूद केलेल्या) यांच्या मेल आयडीवर पाठविण्यात येईल आणि संबधित महाविद्यालयास रासेयो नियमित कार्यक्रमाकरिता प्रत्येक एककानुसार एकूण मंजूर अनुदानापैकी प्रथम हप्ता अनुदान (शासनानाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानाच्या प्रमाणात) महाविद्यालयाच्या रासेयो एकक खात्यावर RTGS/NEFT द्वारे वर्ग करण्यात येईल.

एकक मागणीप्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात भरून रासेयो संकेतस्थळावर अपलोड केला नसल्यास संबंधित महाविद्यालयाच्या रासेयो एककाची/एककांची मान्यता अबाधित राहणार नाही. सन २०२१–२२ ह्या वित्तीय वर्षात रासेयो योजनेमध्ये विद्यार्थी स्वयंसेवकांना प्रवेश देतांना महाराष्ट्र शासन, रासेयो विभाग

शासननिर्णयाप्रमाणे एस.सी-१२% व एसटी-१०% व इतर ७८% प्रमाणात स्वयंसेवकांचे प्रवेश करणे अनिवार्य आहे. प्रवर्गनिहाय संख्येनुसारच शासनामार्फत/विद्यापीठामार्फत रासेयो महाविद्यालयांना नियमित कार्यक्रम व विशेष शिबिरांचे अनुदान उपलब्ध होणार आहे याची कृपया नोंद घ्यावी.

रासेयो स्वयंसेवक ऑनलाईन नोंदणी, नियमित उपक्रम प्रस्ताव, विशेष शिबिरे प्रस्ताव आणि त्रैमासिक अहवाल, व इतर माहिती Online पद्धतीनेच निर्धारित वेळेत भरून Upload करण्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे.

| क्र. | विषय | कालावधी |
|---|---|---|
| १ | एकक व नियमित कार्यक्रम प्रस्ताव भरणे | ०५ ऑक्टोबर २०२१ पर्यंत |
| २ | विद्यापीठ पोर्टलवर स्वयंसेवक ऑनलाईन नोंदणी | १५ ऑक्टोबर २०२१ पर्यंत |
| २ | रासेयो विशेष शिबिर प्रस्ताव भरणे | २५ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर २०२१ |
| ३ | विशेष शिबिरांतील स्वयंसेवक ऑनलाईन नोंदणी | २५ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर २०२१ |
| ४ | त्रैमासिक अहवाल भरणे | माहे एप्रिल, मे, जून (३० जुलै पर्यंत)<br>माहे जुलै,ऑगस्ट,सप्टेंबर (५ ऑक्टोबर पर्यंत)<br>माहे ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर (५ जानेवारी पर्यंत)<br>माहे जानेवारी, फेब्रुवारी, मार्च (२० मार्च पर्यंत) |
| ५ | इतर उपक्रमांचे अहवाल | परिपत्रकातील निर्देश आणि उपक्रम समाप्तीनंतर दुसऱ्या दिवशी |
| ६ | नियमित उपक्रम व विशेष शिबिरे लेखे सादर | १५ फेब्रुवारी ते १० मार्च २०२२ |

सन २०२१-२२ या वर्षात विद्यापीठ रासेयो विभागाने निर्धारित व अग्रेषित केलेल्या रूपरेषेनुसार रासेयो उपक्रम राबवावेत. प्रत्येकी किमान १०० स्वयंसेवक संख्या असलेल्या दोन किंवा दोनपेक्षा जास्त एककांसाठी किमान एक महिला कार्यक्रम अधिकारी यांची नेमणूक करणे अत्यावश्यक आहे आणि कार्यक्रम अधिकारी नेमणूक करताना रासेयो संचलनालय, युवा व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक नियमावलीनुसार रासेयोच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी कार्यक्रम अधिकाऱ्यांकडे एन.सी.सी.,शारिरिक शिक्षण, विद्यार्थी विकास व परीक्षा अथवा अन्य तत्सम कोणताही कार्यभार नसावा याची काटेकोर काळजी घ्यावी.

कोरोना महामारीचा प्रादुर्भाव पाहता उपक्रमादरम्यान महाविद्यालयांनी योग्य ती दक्षता घ्यावी. महाविद्यालयास एकक मंजूर करताना महाविद्यालयाचा मागील वर्षातील उपक्रमांचा तसेच कोरोना आपत्तीच्या प्रादुर्भाव काळात महाविद्यालयाने राबवलेले उपक्रम, स्वच्छ वारी-स्वस्थ वारी-निर्मल वारी-हरित वारी उपक्रमात केलेले कार्य, परिपत्रकानुसार राबविलेले उपक्रम, तिमाही अहवाल, नियमित कार्यक्रम मंजूर विद्यार्थी संख्यापूर्ती, नियमित कार्यक्रम व लेखे सादरीकरण इत्यादींचा आढावा घेऊन एकक मंजूर करण्याबाबतचे सर्व अधिकार राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने राखून ठेवले आहेत. त्यानुसार अनुदानित अथवा स्वयंनिर्वाही एकक मंजूर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

**सोबत** :१. Online Application User Mannual

२. Govt. of Maharashtra Action Plan of NSS for 2021-22

३. प्रत्येक महाविद्यालयास एककनिहाय स्वंतत्र कार्यक्रम अधिकारी मंजूर करण्यात येईल.
(उदा. २००/३०० रासेयो स्वयंसेवक एकक मंजूर असणाऱ्या महाविद्यालयास युनीट १ करिता १००, युनीट २ करिता १०० व युनिट ३ करिता १०० याप्रमाणे कार्यक्रम अधिकारी व एकक मंजूर करण्यात येईल.)